# महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग, मुंबई

## अधिसूचना

**विद्युत अधिनियम, २००३**

**क्र. मविनिआ/तांत्रिक/विनियम/** - विद्युत अधिनियम, २००३ (२००३ चा ३६) मधील कलम १८१ च्या उप-कलम (आर) आणि (एस) सह कलम ४२ च्या उप-कलम (५) ते (७) ने प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा तसेच या संदर्भात समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून व पूर्व-प्रसिध्दीनंतर, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग याद्वारे, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंच आणि विद्युत लोकपाल) विनियम, २०२० (‘**मुख्य विनियम**’) या विनियमांमध्ये सुधारणा करण्यासाठी खालील विनियम करीत आहे :

### १. संक्षिप्त शीर्षक आणि प्रारंभ

१.१ या विनियमांना महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंच व विद्युत लोकपाल) (पहिली सुधारणा) विनियम, २०२४, असे म्हणावे.

१.२ हे विनियम ते ज्या तारखेस शासकीय राजपत्रात अधिसूचित करण्यात येतील त्या तारखेपासून अंमलात येतील.

### २ मुख्य विनियमांच्या विनियम ३ मध्ये सुधारणाः-

२.१ मुख्य विनियमांचे विनियम ३.३ खालीलप्रमाणे बदलण्यात येतील:

“३.३ वितरण परवानाधारक त्याच्या वीज पुरवठ्याच्या क्षेत्रातील प्रत्येक वितरण मंडलात एक (१) मंच स्थापन करील.

परंतु असे की, जर वितरण परवानाधारकाच्या वीज पुरवठ्याचे क्षेत्र बृहन्मुंबई व त्याच्याशी संलग्न क्षेत्र असेल तर वितरण परवानाधारक वीज पुरवठ्याच्या अशा क्षेत्रासाठी किमान एक (१) तरी मंच स्थापन करील.

परंतु आणखी असे की, आयोग वेळोवेळी ज्या मार्गदर्शक सूचना किंवा निर्देश जारी करेल त्यांच्या अधीन राहून, मंचाचे अधिकारक्षेत्र हे वितरण परवानाधारकाकडून ठरविण्यात येईल.

परंतु आणखी असेही की, मुख्य विनियमांतर्गत एकापेक्षा जास्त मंडलांच्या अधिकारक्षेत्रासाठी स्थापित करण्यात आलेला मंच येथून पुढे तो ज्या मंडलामध्ये स्थित आहे त्या मंडलासाठी मंच म्हणून कार्य करेल. तथापि, या विनियमांच्या अधिसूचनेच्या दिनांकापर्यंत प्रलंबित असलेल्या सर्व गाऱ्हाण्यांचा निर्णय, संबंधित मंडलासाठी स्थापन करावयाच्या मंचाकडे हस्तांतरित न करता, केवळ अशा मंचाकडूनच घेण्यात येईल.

*स्पष्टीकरण* - या विनियम ३.३ च्या प्रयोजनासाठी, अशा रितीने, "वितरण मंडल" या शब्दाचा अर्थ मंडळाच्या उत्तराधिकारी व्यक्ती/संस्थेच्या (एन्टीटी) मंडल कार्यालयाच्या अधिकार क्षेत्रातील निश्चित केलेले भौगोलिक क्षेत्र, जे मंडळाच्या पुनर्संघटनेच्या अनुषंगाने विजेच्या वितरणाच्या कार्यांच्या संबधात असेल, असा राहील."

२.२ मुख्य विनियमांतील विनियम ३.४ वगळण्यात येतात.

## ३ मुख्य विनियमांच्या विनियम ४ मध्ये सुधारणा

३.१ मुख्य विनियमांच्या विनियम ४.१ च्या उप-खंड (ए) खालीलप्रमाणे बदलण्यात येतील:

"(ए) या मंचाचा अध्यक्ष हा सेवानिवृत्त ज्येष्ठ न्यायिक अधिकारी; किंवा सेवानिवृत्त शासकीय अधिकारी जो अतिरिक्त जिल्हाधिकारी किंवा समकक्ष पदापेक्षा खालील दर्जाचा नसेल; किंवा एखाद्या नामांकित अभियांत्रिकी महाविद्यालयाचा सेवानिवृत्त प्राचार्य; किंवा एखाद्या नामांकित संस्थेतील विद्युत अभियांत्रिकी विभागाचा सेवानिवृत्त प्राध्यापक असेल; किंवा शासनाचा सेवानिवृत्त ज्येष्ठ विद्युत अभियंता असेल.

परंतु असे की, अध्यक्षांना महाराष्ट्र राज्याच्या स्थानिक भाषेचे कामापुरते ज्ञान असेल.

परंतु आणखी असे की, इच्छुक व्यक्तिंकडून अर्ज मागविण्यात आल्यानंतर आणि उमेदवारांच्या संक्षिप्त यादीमधून निवड करुन आयोगाकडून अध्यक्षांची नियुक्ती करण्यात येईल.

परंतु आणखी असेही की, आयोग परवानाधारकाला अशी निवड प्रक्रिया आयोगाच्या मार्गदर्शना अंतर्गत करण्याचे विनिर्देशपूर्वक निर्देश देऊ शकेल. अशा प्रकरणी आयोग निवड समिती नामनिर्देशित करेल.

परंतु असेही की, आयोग अशा अर्जदारांच्या सचोटी आणि पूर्वपिठीकेची पडताळणी करील."

## ४ मुख्य विनियमांच्या विनियम ५ मध्ये सुधारणा

४.१ मुख्य विनियमांतील विनियम ५.३ चे परंतुक वगळण्यात येते.

४.२ मुख्य विनियमांतील विनियम ५.४ चे दुसरे आणि तिसरे परंतुक वगळण्यात येते.

## ५ मुख्य विनियमांच्या विनियम १६ मध्ये सुधारणा

५.१ मुख्य विनियमांचा विनियम १६.१ खालीलप्रमाणे बदलण्यात येतील:

“१६.१ विद्युत लोकपाल हे उच्च न्यायालयाचे सेवानिवृत्त न्यायमूर्ती किंवा सेवानिवृत्त जिल्हा न्यायाधीश, शासनाचे सेवानिवृत्त सचिव किंवा समकक्ष अधिकारी यांच्यामधून गठीत करण्यात येतील.”

## ६ परिशिष्टमध्ये सुधारणा

६.१ मुख्य विनियमांचे परिशिष्ट १ वगळण्यात येते.

**मुंबई**
**दिनांक: ---, २०२४**

**(डॉ. राजेंद्र गं. आंबेकर)**
सचिव,
महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग